अहमदनगर जिल्ह्यातील राहता येथे स्थापन करण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधीश, (वरिष्ठ स्तर) या न्यायालयाच्या निधीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**विधि व न्याय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण ०११९/प्र.क्र.१७/कार्यासन ११**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०८ मार्च, २०१९.

**संदर्भ:** १. विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण ०७१६/५३२/प्र.क्र.८७/कार्या.११, दि.५/१/२०१९
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-पूरक २०१९/प्र.क्र.४१/अर्थ ३, दि.८/३/२०१९

**प्रस्तावना :**

मा.उच्च न्यायालयाच्या प्रस्तावानुसार अहमदनगर जिल्ह्यातील राहता येथे दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर हे न्यायालय स्थापन करण्यास व त्यासाठी पदनिर्मिती करण्यास शासन निर्णय क्र.संकिर्ण ०७१६/ ५३२/ प्र.क्र.८७/ कार्या.११, दि.५/१/२०१९ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयामध्ये निधी उपलब्धतेबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील असे नमूद केले होते. याबाबत फेब्रुवारी, २०१९ च्या अधिवेशनामध्ये लाक्षणिक पुरवणी मागणी वित्त विभागामार्फत विधानमंडळास सादर केली होती. ती मंजूर झालेली आहे. अशाप्रकारे सदर न्यायालयासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

१. अहदमनगर जिल्ह्यातील राहता येथे स्थापन केलेल्या दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर या न्यायालयाकरीता खालीलप्रमाणे लाक्षणिक पुरवणी मागणी विधानमंडळाने मंजूर केलेली आहे.

| अ.क्र. | उद्दिष्ट | रक्कम रूपयात |
|---|---|---|
| १ | ०१ -वेतन | १००० |
| २ | ०२ -मजूरी | १००० |
| ३ | ०३ - अतिकालीक भत्ता | १००० |
| ४ | ०६ - दूरध्वनी/वीज/पाणी | १००० |
| ५ | १० - कंत्राटी सेवा | १००० |
| ६ | ११ - देशांतर्गत प्रवास खर्च | १००० |
| ७ | १३ - कार्यालयीन खर्च | १००० |
| ८ | १४ -भाडेपट्टी व कर | १००० |
| ९ | १६ -प्रकाशने | १००० |
| १० | १७- संगणक खर्च | १००० |
| ११ | २४ -पेट्रोल, तेल व वंगण | १००० |
| १२ | २६ -जाहिरात व प्रसिध्दी | १००० |
| १३ | २७ -लहान बांधकामे | १००० |
| १४ | २८- व्यावसायिक सेवा | १००० |
| १५ | ३१ -सहायक अनुदाने | १००० |
| **एकूण** | | **१५०००** |

२. सदर लाक्षणिक पुरवणी मागणी, मागणी क्र.जे-१, २०१४, न्यायदान, १०५, दिवाणी व सत्र न्यायालये, (०२) जिल्हा व सत्र न्यायाधीश, (०२)(०१) जिल्हा व सत्र न्यायाधीश (अनिवार्य) (२०१४ ०१७२) या लेखाशीर्षाखाली मंजूर झालेली आहे. त्यानुसार सदर लाक्षणिक पुरवणी मागणीचा उपरोक्त तक्यातील नमूद पंधरा उद्दिष्टांकरिता मंजूर झालेला रु.१५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार फक्त) इतका निधी नियंत्रक अधिकारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर (जे-००२२ ) यांना याद्वारे वितरीत करण्यात येत आहे. सदर न्यायालयासाठी आवश्यक तो खर्च उपरोक्त नमूद लेखाशीर्षाखालील सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-पूरक २०१९/प्र.क्र.४१/अर्थ ३, दि.८/३/२०१९अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३१११७५३४१०७१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Santosh Sampatti Navagire

Digitally signed by Santosh Sampatti Navagire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=214b4345a2842afe7dd0cbda9e8d83579cbedaaaef30f215ceda096e4e407797, serialNumber=0cb1b0de020015cf6d1f800579271f4816460b1802c2ae247dd6dd6f47462cd3, cn=Santosh Sampatti Navagire
Date: 2019.03.11 17:56:58 +05'30'

**( सं.सं.नवगिरे )**
कार्यासन अधिकारी

**प्रति,**

१) मा.प्रबंधक (निरिक्षणे १), उच्च न्यायालय, (अ.शा.) मुंबई (पत्राने)
२) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर,
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
४) जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर,
५) वित्त विभाग, कार्यासन-व्यय ५, मंत्रालय, मुंबई,
६) विधि व न्याय विभाग, कार्यासन-२३ व २४, मंत्रालय, मुंबई,
७) निवडनस्ती ( कार्यासन ११).